प्रेस नोट दि.२०/०४/२०१९

---

## खडक तपास पथकाची कामगिरी

### वाहतुकीस अडथळा होत असलेल्या महेंद्रा कंपनीचे बुलेरो गाडीस वाहतुक पोलीसांनी लावलेल्या जामर सह गाडी चोरून नेणारा चोरटा खडक पोलीसांचे अटकेत.

सदर बाबत अधिक माहिती अशी की,दिनांक ०५/१२/२०१८ रोजी विक्रम कांबळे पो.ना.६९६३ नेमणुक खडक वाहतुक विभाग,पुणे हे वाहतुक नियमानाचे ड्युटीस हजर असताना महेंद्रा कंपनीची बुलेरो गाडी क्र.एम.एच.१२ के.ई.३७४१ ही विजय भोजनालय समोर,शिवाजीरोड,पुणे येथे वाहतुकीस अडथळा होईल अशा स्तितीत नोपार्कींगमध्ये पार्क केलेल्या आवस्थेत मिळून आल्याने व सदर वेळी गाडीवरील चालक हजर नसल्याने टोचन मोबाईल येवू पर्यंत फिर्यादी यांनी सदर गाडीस जामर लावून पुढील काराईसाठी गेले असताना सदर गाडीचा चालक यांनी फिर्यादी यांनी लावलेल्या जामरसह बुलेरो गाडी चोरून नेली म्हणुन सदरबाबत खडक पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.४२९/२०१८,भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्याचा तपासचालू असताना पो.कॉ.महावीर दावणे,पो.कॉ.आशीष चव्हाण,पो.कॉ.प्रमोद नेवसे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी प्राप्त झाली की सदरची चोरी करणा-या आरोपीचे नाव सुनिल सोपान रेणुसे रा.मु.पो.पाले,ता.वेल्हा,जि.पुणे हा असल्याची बातमी प्राप्त झाल्याने सदरची बातमी मा.राजेन्द्र मोकाशी सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना सांगुन त्याचे मार्गदर्शनाखालील नमुद इसमास मु.पो.पाले,ता.वेल्हा,जि.पुणे येथून ताब्यात घेवून चोरीस गेला जामर जप्त करण्यात आले असून पुढील तपास पो.हवा.संजय दिघे हे करीत आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी सपोनिरी श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी संजय दिघे, महावीर दावणे,आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, यांचे पथकाने केली.

प्रेस नोट दि.२०/०४/२०१९

---

## खडक तपास पथकाची कामगिरी

## रिक्षेत प्रवासी महिलेने पर्स ठेवल्याचे पाहुन पर्ससह फरार झालेला रिक्षा चालक खडक पोलीस स्टेशनकडील पोलीसांनी २४ तासाचे आतमध्ये जेरबंद केला.

सदर बाबत अधिक माहिती अशी की,महिला नामे सौ.आरती दिनेश पाचारणे,धंदा घरकाम रा. खडकी पुणे या व त्याचे मामाची मुले असे काल दिनांक १९/०४/२०१९ रोजी दुपारचे वेळेस पुणा स्टेशन ते स्वारगेट असे रिक्षाने प्रवास करून स्वारगेट येथे त्यांचेकडील पर्समधून सुट्टे पैसे काढून पर्स रिक्षेमधिल सिटवरती ठेवून रिक्षावाल्यास रिक्षेचे भाडे देत असताना रिक्षेमध्ये फिर्यादी यांनी पर्स ठेवलेली पाहुन रिक्षा चालकाने पर्स चोरून नेली म्हणुन सदरबाबत खडक पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२०८/२०१९,भादवि कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्ह्याचा तपासचालू असताना पो.कॉ.महावीर दावणे,पो.कॉ.आशीष चव्हाण,पो.कॉ.प्रमोद नेवसे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी प्राप्त झाली की सदरची चोरी करणारा रिक्षा चालक सिहगड गॅरेज घोरपडेपेठ येथील रिक्षा स्टॅण्डवरती थांबलेला आहे अशी माहिती प्राप्त होताच.सदरची बातमी मा.राजेन्द्र मोकाशी सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडक पोलीस स्टेशन पुणे यांना सांगुन त्याचे मार्गदर्शनाखालील सदर ठिकाणी खडक पोलीस स्टेशनकडील तपासपथकातील अधिकारी व स्टाफने सापळा रचुन सदर रिक्षा चालक नामे खलीद अबुबकर शेख वय ३९ वर्ष रा.५९,गणेशपेठ,शिवराम दादा तालिमजवळ,पुणे यास त्याने दाखल गुन्हा करताना सदरची रिक्षेचा वापर केल्याने त्यास रिक्षेसह ताब्यात घेण्यात आले व त्याचेकडून तपासादरम्याण दाखल गुन्ह्यातील चोरीस गेले किं.रू.१,२०,०००/- चे तिन तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र,रोख रक्कम ८००/- रू.व पर्स असा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदरचा आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून त्याचे विरूध्द विवीध पोलीस स्टेशनला चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

वर नमुद सर्व कारवाई ही श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे , श्री.सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त फरासखाना विभाग यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन चे श्री.राजेन्द्र मोकाशी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.उत्तम चक्रे पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकाचे प्रभारी श्री.उमाजी राठोड, पोलीस कर्मचारी विनोद जाधव, संदिप पाटील, रवी लोंखडे, आशिष चव्हाण, प्रमोद नेवसे, समीर माळवदकर, बंटी कांबळे, राकेश क्षिरसागर, महावीर दावणे, योगेश जाधव, विशाल जाधव, इम्रान नदाफ, सागर केकाण, हिम्मत होळकर,महिला कर्मचारी साधना समींदर व जयश्री पवार यांचे पथकाने केली.